# प्रकरण दुसरे

# बिळाशी जंगल सत्याग्रह : पार्श्वभूमी

# प्रकरण दुसरे

## बिळाशी जंगल सत्याग्रह : पार्श्वभूमी

१९३० साली महात्मा गांधीनी केलेली दांडी यात्रा व मिठाचा प्रतिकारात्मक सत्याग्रह ही भारतीय स्वातंत्र्यलढयाला नवी कलाटणी देणारी अभूतपूर्व घटना ठरली. यातुनच परकीय सत्तेविरुद्ध लढा देत असतानाच जनआंदोलनातून विकसित झालेली राष्ट्राच्या भावी जडणघडणीची धोरणात्मक दृष्टी हे भारतीय स्वातंत्र्यालढ्याचे वैशिष्ट म्हणावे लागेल. या कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून जंगल सत्याग्रहाला अतिशय महत्त्वपूर्ण असे स्थान दिले गेले, ज्यात शेतकऱ्यांची भूमिका महत्त्वाची होती. गांधीजींची सविनय कायदेभंग चळवळ ही मिठाचा सत्याग्रह, दारुबंदी चळवळ, स्वदेशी चळवळ, शेतसारा बंदी कायदा, सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार, सरकारी शाळा-कॉलेजांवर बहिष्कार व खेड्यातील जंगल सत्याग्रह या माध्यमातून सर्व देशभर चालवली. यातुनच तिला जनआंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले.

मिठाचा कायदेभंग झाल्यानंतर १९३० च्या जूनमध्ये पावसाच्या आगमनामुळे पूर्ण भारतभर जंगल कायदेभंगाची सुरुवात झाली. या बाबतीत गांधीजींचा विचार घेण्यात आला होता. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनेही या कायदेभंगाला परवानगी दिली होती. समुद्राच्या पाण्यावर ज्याप्रमाणे सर्व मनुष्यजातीचा सारखाच हक्क आहे, त्याचप्रमाणे देवाने दिलेल्या जमिनींवर जनतेचा सारखाच हक्क आहे व त्यातल्या त्यात जंगलावर व त्यात उत्पन्न होणाऱ्या झाडपाल्यावर व वनस्पतीवर मनुष्य प्राण्याचा हक्क आहेच आहे.

पण ब्रिटीश काळात जंगलावरील गरीब जनतेचा हक्क नष्ट करण्यात आला. १९ व्या शतकात ब्रिटीश प्रशासनाने मात्र भारतीय जंगलांवरील गरीब शेतकऱ्यांचा हक्क जंगलविषयक कडक कायदे करुन नष्ट केला. जंगलातून मूठभर गवत आणण्याला, लाकडाची फाटी तोडण्याला, झाडाचे पान तोडण्याला ब्रिटीशा कायद्यांनी मनाई केली. महात्मा गांधीजी मिठाच्या कायद्याचा भंग करण्यासाठी ज्या चळवळीची सुरुवात केली, ती हिंदुस्थानाभर पसरली. महाराष्ट्रातही याचे पडसाद मोठ्या प्रमाणात जाणवले. या चळवळीचे विशेष म्हणजे यात लाखो शेतकऱ्यांनी भाग घेतला. या काळाचे वैशिष्ट म्हणजे महात्मा गांधीजीचे तत्त्वज्ञान तळागाळीतील लोकांपर्यंत पोहचले. तळागाळातील या लोकांमध्ये आपल्या हक्कांची जाणिव करुन देण्याच्या जागृतीची गांधीजींनी सुरुवात केली. याचे स्वरुप १९३० मधील गांधीजींच्या सविनय कायदेभंग चळवळीतील लोकांच्या सहभागावरुन जाणवते.

ब्रिटीश अर्थनितीसाठीही या जंगलाचे फार महत्त्व होते. भारतीय ग्रामीण जीवन हे जंगल उत्पादनावर अवलंबून होते. जंगलातील फळझाडे विकून गरीब शेतकरी आपला उदरनिर्वाह करीत त्यांची पाळीव जनावरे याच जंगलातील चारा खाऊन दूध देत, त्या दूधावरच शेतकऱ्यांची भूक भागून ते कामासाठी तंदुरुस्त होत. हे दूध विकूनही ते पैसे मिळवत व या पैशातूनच सरकारचे कर भरले जात. यावर ब्रिटीशांनी बंधने आणण्यास सुरुवात केली होती. म्हणूनच अनेक कायद्यान्वये त्यांनी भारतीयांना जंगलविषयक कर भरण्यास व कायदे पाळण्यास सक्तीचे केले.

## २.१. जंगलाचे ग्रामीण जीवनातील महत्त्व :

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारत हा कृषीप्रधान देश आहे. 'शेत जमीन' हा शेतकऱ्यांचा आत्मा आहे. म्हणून ग्रामीण भागातील माणसांना जगण्यासाठी जमीन, जनावर आणि जंगल या तीन जकारांची आवश्यकता असते.[१]

शेतकऱ्यांप्रमाणेच काटकरी, ठाकूर, धनगर, भिल्ल, कोळी, वारली यासारख्या काही आदिवासी जमाती ह्या जंगलावरच अवलंबून होत्या. जळणासाठी लाकूड आणणे, तेच लाकूड घरोघरी जाऊन विकणे हा जवळजवळ गरीब शेतकरी व आदिवासी यांचा नित्यनियमच चालू होता. रानातील मध गोळा करुन विकणे, रानातील फळे-करंवदे, जांभूळ, आळू, आंबे व शिककाई यांचा व्यापार करणे. म्हणजेच धान्याच्या बदल्यात त्याची विक्री करणे, हा त्यांचा उदरनिर्वाहासाठी छोटासा व्यापारच झाला होता. १९३० च्या काळात ही खेडीही स्वयंपूर्ण होती. बलुतेदारी पद्धतीने गावातल्या गरजा गावातच भागवल्या जात. महार,मांग, चांभार, सुतार, लोहार, न्हावी, परीट, गुरव, कुंभार, कोळी, सोनार व मुलाणी हे बारा बलुतेदार शेतकऱ्यांच्या गरजा गावातल्या गावातच पुर्ण करत. गुरे ही त्यांच्या दूधदुपत्याची सोय होती, परंतु त्यांचा कोंडमारा करण्याचा प्रयत्न या बिटीश शासनाने केला. तसेच राखीव जंगली भागात गुरे चराईस बंदी व काही प्रमाणात फो आकारण्यात येऊ लागली.

यासाठी जंगलांची मुख्य मोठी जंगले आणि गौण छोटी जंगले अशी विभागणी करण्यात आली.[२] आरक्षित जंगलात गुरे चारण्यास, गवत किंवा झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली. त्यामुळे विशेषत: आदिवासींना जळणासाठी लाकूड फाटा, झाडावरची फळे, औषधी वनस्पती, वनसंरक्षकाची नजर चुकवून गोळा कराव्या लागत. साग, शिसव, मिया, रोहण, टेंबूर्गी, मोह, कळंब, हलदावी, अंबा, रियान, जांभूळ, चिंच, हिरडा, धावडा अशी चौदा प्रकारची झाडे राखीच जंगलात घालण्यात आली, ती तोडण्यास बंदी घालण्यात आली.[३] यामुळे शेतकऱ्याची फार मोठी गैरसोय होऊ लागली होती. इमारती बांधकामासाठी या झाडांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात असे, म्हणून यास फार मागणी होती. यातून आर्थिक लाभ ही फार होता आणि हिच गोष्ट ब्रिटीशांना खटकली. १९२७

च्या कायदयानुसार ब्रिटीशांनी जंगलाचे तीन विभाग पाडले, १) राखीव जंगले २) गाव जंगले ३) सरंक्षित जंगले या राखीव जंगलातच त्यांनी अनेक झाडांना संरक्षण दिले. यातूनच त्यांनी जंगलविषयक नविन कायद्याची निर्मिती केली. म्हणूनच या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्रातील आयोजित सत्याग्रही शिबीरातून जंगल सत्याग्रहाची पार्श्वभूमी तयार करण्यात आली.

## २.२. ब्रिटीशांचे जंगलविषयक धोरण :

ब्रिटीशांनी भारतात दडपशाहीचे धोरण अवलंबिले होते. राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक दृष्ट्या ते भारतीयांवर अन्याय करत होते. मात्र जेव्हा पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा रयतही शासनकर्त्यांवरच अवलंबून रहाते. म्हणूनच या गरीब जनतेवर आपला वचक बसविण्यासाठी व आपला आर्थिक फायदा लक्षात घेऊन ब्रिटीशांनी जंगलविषयक अनेक कायदे निर्माण केले. एकट्या मुंबई इलाख्यातून जंगलापासून मिळाणारे उत्पन्न तीस लाख रुपये होते.[४] उपासमारीने हैराण झालेल्या शेतकऱ्यांवर हा प्रत्यक्ष बोजा होता. विशेष म्हणजे ज्या तऱ्हेने तो कर उकळण्यात येत होता. त्यामुळे जंगलाच्या अधिकाऱ्यांना अशिक्षित शेतकऱ्यांची पिळवणूक करण्याचा व त्यांच्यावर जुलूम -जबरदस्ती करावयाचा जणू परवानाच मिळाला होता. साग, शिसव व चंदन या झाडांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्यांचा राखीव जंगलात समावेश केला होता.[५] थोडक्यात भारतीयांवर दडपशाही व आर्थिक उत्पन्न या दोन हेतू साठी ब्रिटीशांनी भारतीय जंगलाबाबत कायदे करुन जाचक असे पैशाच्या स्वरुपातील कर भरण्यास भारतीयांना भाग पाडले.

१९ ऑक्टोंबर १८९४ रोजी जंगल खात्याच्या धोरणासंबंधीचा जो सरकारी ठराव काढण्यात आला त्यात असे स्पष्ट करण्यात आले की, "जंगल

खात्याचा एक हेतू असा आहे की, लाकूड व गवत यांचा नाश होऊ न देणे व दुसरा हेतू हा की, जंगलातून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचा उपयोग जितक्या अधिक किफायतीने व सोयीने लोकांना करु देता येईल, तितका करु देणे, आणि हे दोन हेतू साध्य होण्याच्या दृष्टिने जंगल खात्याचे उत्पन्न वाढविण्याचा विचार अगदी कमी दर्जाचा समजण्यात यावा.[६] सरकारचेच धोरण मात्र याच्या अगदी उलट होऊ लागले. १८९४ च्या ठरावातील वरती सांगितलेले दोन्ही हेतू बाजुला ठेवून ज्याचा गौण विचार करावयास सांगितले त्या जंगल उत्पन्नाला समोर ठेवून ते वाढविण्याच्या दृष्टिकोनातून जंगले राखीव ठेवून जंगल कायदे मोडणाऱ्यास पैशाच्या स्वरुपात भरपूर दंड आकारण्यात आले. त्याचमुळे लोकामध्ये असंतोष उत्पन्न होऊ लागला.

१८१८ साली हिंदुस्थानातील जंगल खात्याचे उत्पन्न १६५ लाख होते, ते १९२८ साली ५९९ लाख रुपये येवू लागले व निव्वळ उत्पन्न ७५ लाख रुपये होत असे, ते १९२८ -२९ साली २६६ लाख रुपयापर्यंत वाढले.[७] एकट्या मुंबई सरकारचे जंगल खात्याचे वार्षिक उत्पन्न ७६-७७ लाख रुपये असून वार्षिक खर्च ४२ लाख ७०हजार रुपये होते.[८] यावरुन फक्त ३० लाख रुपयांच्या उत्पन्नाकरिताच बाजारपेठेत मागणी असणाऱ्या झाडांना तोडण्यास मनाई करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांची गुरे ज्या भागात चरतात त्या भागात चरण्यास मनाई हे नियम मोडल्यास पैशाच्या स्वरुपात दंड, गुरांना कोंडवाड्यात ठेवणे व त्यांचा लिलाव करुन कसायाला देणे अशा प्रकारचा अन्याय भारतीय गरीब शेतकऱ्यांवर करण्यास सुरुवात झाली. ब्रिटीश शासनाच्या चुकीच्या धोरणामुळेच भारतीयांच्या मनात असंतोष वाढतच चालला. परंतु त्याची पर्वा न करता ब्रिटीशांनी अतिशय जाचक असे जंगलविषयक कायदे केले.

## २.३. ब्रिटीशांचे जंगलविषयक कायदे :

ब्रिटीशांनी जाचक असे जंगलकायदे केले, ज्यात गरीब शेतकरी पिसला गेला. जुन्या १८८५-१८८६ मधील जंगल कायद्यात शेकऱ्यांना थोडी मोकळीक होती.काही भागात त्यांना आपले खाजगी अधिकार दाखविता येत होते. १८८० ला वेगवेगळ्या जिल्हयातील झाडांवरील विशेष हक्कासंबंधाने जो सरकारी ठराव झाला त्यात,

**I) राखीव झाडाबाबत ठराव :**

१) पंच महाल जिल्ह्यात सर्वेच्या वेळीच नव्हे तर पुढे सर्वे होणार असे समजून पुढे १४ प्रकारची झाडे राखून ठेवण्यात यावीत असे ठरले. ती पुढीलप्रमाणे - १)साग २) शिसव ३) मिया ४) रोहण ५) टेंबूर्गी ६) मोह ७) कळंब ८)हलदावी ९) अंबा १०) रियान ११) जांभूळ १२) चिंच १३) हिरडा १४) धावड. बाकी झाडे लोकांचे खास घरगुती उपयोगासाठी मोकळी ठेवावीत. परंतु ती विकण्याचा त्यांना अधिकार नाही. आबां. मोह वगैरे इतर फळझाडे जरी राखीव झाडात समाविष्ट केली असतील तरी फळे व फुले घेण्याचा जो हक्क भिल्ल लोकांकडे चालू आहे. त्याला हरकत करण्याचा इरादा नाही.[९]

**II) पुणे जिल्ह्यातील सागाच्या झाडावरील हक्क :**

लॅन्ड रेव्हिन्यू कोड कलम २१४ कानून नंबर ९८ ब (नीवन कानू ६३) संबंधाने असे फर्मविण्यात येते आहे की, पुणे जिल्हयातील हवेली पुरंदर व जुन्नर तालुके आणि आंबेगाव पेठा यांच्या जंगल सीमेबाहेरील खातेदारांच्या जमिनीतील सागाची झाडे जेव्हा खातेदारांना विकण्यात येतील अथवा इतर रीतीने त्यांची जंगल खात्याकडून व्यवस्था लागेल तेव्हा अशा झाडांच्या मुळापासून किंवा बुंध्यातून जी

मागाहून फूट येईल त्यावर सरकारचा हक्क न राहता ती त्या खातेदाराच्या मालकीची होईल.[१०]

**III) वेगवेगळ्या जिल्ह्यातील झाडांवरील विशेष हक्कासंबंधाने सरकारी ठराव :**

साग, शिसव व तिसव या झाडांस लागू नियम -

१) उभ्या झाडांना मुळीच हात लावता कामा नये. ती झाडे सर्वस्वी सरकारने राखून ठेवली आहेत, व टहाळासाठी (वृक्षाची पानासहित फांदी) देखील छाटावयाची नाहीत.[११]

२) उभी झाडे जेव्हा सरकारकडून तोडण्यात व विकण्यात येतील तेव्हा तोडलेल्या झाडांच्या बुंध्यापासून जे नवे येणारे कोंब ते प्रत्येकी दोन सोडून बाकीच्यांची वाटेल ती व्यवस्था करण्याची खातेदाराला परवानगी देण्यात येईल. प्रत्येक बुंध्यास दोन कोंब सरकारचे म्हणून राखून ठेवले पाहिजे, परंतू ते जेव्हा वाढून तोडण्यासारखे होतील तेव्हा एकदम तोडून नेण्यासाठी निम्मी किंमत देण्यास खातेदार तयार आहे. किंवा काय असे विचारण्यात येईल.[१२]

अशाप्रकारचे कायदे हे जुन्या नियमावलीत होते. पण १९२७ च्या जंगलविषयक ॲक्टमध्ये त्यांनी जाचक अशा अटी केल्या त्या पुढीलप्रमाणे - कलम ७५ (क) अन्वये केलेले कानून आणि वरील लॅन्ड रेव्हिन्यू कोड कलम ४४ अन्वये केलेले कानून साग, शिसव, चंदन आणि तिसव यांस ते लागू पडतात. या खेरीज बाकीचे बाबतीत रद्द करण्यात आले आहेत.[१३]

३) राखलेले किंवा संरक्षण केलेले जंगलात न वाढणारी परंतू सरकारच्या मालकीची झाडे. अशाप्रकारच्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी व ती पुन्हा उत्पन्न करण्यासाठी सन १८७९ चे लॅन्ड रेव्हिन्यू कोडाची कलमे व कानून येणेप्रमाणे -

हा ॲक्ट ठरल्यापूर्वी सर्व सेंटलमेंट संपत्ती असतील त्यांच्या संवर्धाने झाडावरील सरकारचे हक्क देणे.

**कलम ४० –**

ज्या गावांचे किंवा ज्या भागांच्या प्रथमचे सर्व सेंटलमेंट हा ॲक्ट ठरल्यापूर्वी सपंले असेल त्या गावात किंवा त्या गावच्या त्या भागात दुमाला नसणाऱ्या जमिनीतील सर्व झाडावरील सरकारचा हक्क खातेदारास दिला आहे. असे समजावे. मात्र सदरहू प्रकारचे सेंटलमेंट होते किंवा त्यावळेचे सुमारास मुद्दाम केलेल्या हुकूमावरुन किंवा सदरहू प्रकारचे सेंटलमेंट होतेवेळी कोणताही कानून किंवा साधारण हुकूम अंमलात असेल त्यावरुन किंवा सदरहू प्रकारचे सेंटलमेंट होतेवेळी किंवा ते झाल्यानंतर कोणतेही वेळी केलेल्या व प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यावरुन सरकाराने किंवा सर्वेच्या कोणत्याही अंमलदाराने राखून ठेवलेल्या झाडावरील सरकारचा हक्क खातेदारास दिला असे समजू नये. परंतु सन १८६५ चा ऑगस्टचा मुंबई हा ॲक्ट १ ठरण्यापूर्वी जी सर्व सेंटलमेंट संपली असतील त्यांच्या संबंधाने खातेदारास हक्क दिला, हा ठराव सागवानी किंवा शिसवाच्या किंवा चंदानाच्या झाडास लागू नाही. सदरहू प्रकारच्या झाडावरील सरकारचा हक्क दिला असे समजू नये मात्र तशा मजकुराचे स्पष्ट व मुद्दाम शब्द लिहिले असतील तर दिला असे समजावे.[१४]

**कलम ४१–**

**सरकारी झाडे व जंगले :**

सदरी शेवटच्या कलमान्वये मुद्दाम राखून ठेवलेल्या सर्व झाडांवरील हक्क आणि १८६६ चा मुंबईचा १ ला ॲक्ट यांच्या ३२ व्या कलमान्वये किंवा या ॲक्टच्या ३८ व्या कलमांमुळे जंगल राखून ठेवण्यासाठी निराळया करुन ठेवलेल्या जमिनीवर वाढणाऱ्या सर्व झाडांवरील, झुडपावरील, जंगलावरील व इतर स्वाभाविक

उत्पन्नावरील हक्क आणि झाडे, झुडपे, जंगल व इतर स्वाभाविक उत्पन्न ही कोठेही वाढत असोत त्यावरील हक्क ती कोणा व्यक्तिची किंवा मालमिळकत धारण करु शकत असणाऱ्या असामीच्या समुहाची माल मिळकती असतील त्या खेरीज करुन सरकारची आहेत असे समजावे. सर्व या प्रकारची झाडे, झुडपे, जंगल व इतर स्वाभाविक उत्पन्न ही सरकार वेळोवेळी जी रिती फर्मावितील त्यारितीने सांभाळून ठेवली पाहिजेत किंवा त्याची व्यवस्था केली पाहिजे.[१५]

**कलम ५८–**

**सामान्यता राखून ठेवलेले हक्क –** परिच्छेद

झाडावरील सरकारचा हक्क ४० व्या कलमाच्या तिसऱ्या परेग्राफमध्ये खातेदारास सामान्यत: कोठपर्यंत दिला आहे. ते कानून १७ अन्वये प्रसिद्ध करावयाच्या जाहिरनाम्यात निर्दिष्ट केले पाहिजे.

सदरहू प्रमाणे समान्यता दिलेला हक्क खाली सांगितलेली झाडे खेरीज करुन साधारणात सर्व झाडास लागू असेल. सदरहू खेरीज केलेले झाड येणेप्रमाणे.[१६]

अ) सरकारने अगर सरकारच्या हुकूमावरुन लावलेली रस्त्याच्या बाजूची झाडे

ब) साग, शिवस व चंदन.

क) ज्या झाडांच्या उत्पन्नाची आजपर्यंत सरकारने व्यवस्था केली असेल ती झाडे.

जमीन महसुलाच्या सेंटलमेंट प्रथम सुरु करण्यात आल्यानंतर जेव्हा एखाद्या जमिनीची व्यवस्था लावण्यात येईल. तेव्हा अशा झाडांची व्यवस्था देखील कलम ६२ अन्वये लावली पाहिजे.

ड) जमिनीचे खाते ज्या शर्तीवर दिले असेल त्या अन्वये मुद्दाम राखून ठेवलेली झाडे.

**कलम ५९ –**

**सामान्यता राखून ठेवलेले हक्क –**

राईतील झाडे, कलेक्टराने ठरविलेली देवळाभोवतीची व छावणीच्या जागा सभोवतीची झाडे आणि साग, शिसव अगर चंदन यांखेरीज जी इतर झाडे कोणत्याही कारणाने विशेष किंमतीची किंवा उपयोगाची असतील ती झाडे सेंटलमेंटच्यावेळी मुद्दाम राखून ठेवण्यात येतील व ती मुद्दाम राखून ठेवल्याविषयी सेंटलमेंटच्या दप्तरी नोंद करण्यात येईल.[१७]

असे अनेक प्रकारे कायद्यात बदल होत होते. कायद्यात दुरुस्त्या होत होत्या व नवीन कायदेही निर्माण होत होते.

## अ) जंगल कायदयात झालेली दुरुस्ती:

**१) जुना नियम :**

कोणताही मनुष्य सब असिस्टंट, कानसरव्हेटरपेक्षा कमी दर्जाचा नाही. अशा फॉरेस्ट ऑफिसरची लेखी परवानगी पूर्वी घेतल्यावाचून कोणतेही राखलेले जंगल (मग ते गावचे जंगल असो अगर नसो) किंवा कोणतेही संरक्षण केलेले जंगल याच्या हद्दीपासून एक मैलाच्या आत करवतण्यासाठी खाडा करता कामा नये अगर सुतार कामी लाकडे घडता, कापता, जाळता, लपविता अगर त्यावर निशाणी करता कामा नये.[१८]

**खुलासा –**

ही कानू अशा हद्दीच्या आत उभी असणाऱ्या किंवा वाढणाऱ्या झाडास लागू असून फक्त सदर्हू अवटात व्याख्या केली आहे. तशा सुतारकामी लाकडासच

लागू आहे. जेव्हा अशा हद्दीच्या आतील एखाद्या खाजगी मालकीची झाडे पडलेली असतील किंवा तोडलेली असतील तेव्हा -

अ) न कापलेली सुतारकामी लाकडे वाहून नेण्याचे काम सोपे होण्याचे कारणासाठी सदरहू झाडाच्या फक्त फांद्या छाटण्याकरिता किंवा

ब) राबासाठी किंवा कुमारी शेतीसाठी (ज्या शेतात अजून एकदाही पेरणी केली नाही असे शेत) अशा झाडाच्या फांद्या कापून जाळण्याकरिता या कानूनान्वये परवानगी घेणे जरुर आहे. असे समजू नये.[१९]

**२) नवीन नियम -**

फॉरेस्ट खात्याचे ताब्यातील कोणत्याही राखलेल्या जंगलाच्या किंवा संरक्षण केलेल्या जंगलाच्या हद्दीच्या आत किंवा अशा हद्दीपलीकडील एक मैलाच्या आत कोणत्याही मनुष्याने एक्स्ट्रा असिस्टंट कानसरव्हेटरहून कमी दर्जाचा नाही अशा फॉरेस्ट ऑफिसरच्या आगाऊ लेखी मजुंरीवाचून कोणतीही लाकडे करवतण्यासाठी खड्डा काढू नये. सुतार कामी लाकडे कापण्यासाठी त्याचे रुपांतर करण्यासाठी किंवा ती तयार करण्यासाठी किंवा कोळसा तयार करण्यासाठी कोणतीही यंत्रे किंवा इतर साधने उभारु नयेत.[२०]

**खुलासा -**

१) हा नियम नेहमीच्या घरगुती सुतारकामाला अथवा अशाच तऱ्हेच्या लहान प्रमाणावरील इतर कामांना लागू पडत नाही.[२१] (सरकारच्या रेव्हिन्यू डिपार्टमेंटचा जाहिरनामा नं. ४९१३ तारीख. १५ मे १९०८ वरुन हा जास्त खुलासा करण्यात आला).

२) यावरुन असे दिसते की नवीन नियामाप्रमाणे असकस कामाकरिता खड्डा काढणे किंवा यंत्रे इतर साधने उभारणे इतके प्रमाणात जेव्हा इमारती लाकडांचे काम

चालण्याचे असेल अशावेळी फक्त फॉरेस्ट अंमलदारांची आगावू परवानगी घेतली पाहिजे आणि साधारणपणे शेतीच्या किंवा घरकामाच्या उपयोगाकरिताच लाकडे कापण्यासाठीच परवानगी मिळाल्याबद्दल अर्ज करण्याची जरुरी नाही. फॉरेस्ट खात्याचे कामगार यासहित अशा बाबतीत लोकांस हरकत करु नये म्हणून हुकूम देण्यात येत आहेत.[२२]

३) नवीन नियम लागू आहेत अशा राखलेल्या किंवा संरक्षण केलेल्या जंगलापासून एक मैलाने आत येणाऱ्या गावच्या क्षेत्राबद्दल लिस्ट तयार करण्यात येणार आहेत व ती लवकर प्रत्येक गावात पाहण्यास मिळतील.[२३]

असे पत्रक कलेक्टर कुलाबा, अलीबाग यांनी २३ माहे मे सन १९०८ मध्ये काढले.

यावरुन हे स्पष्ट होते की, ब्रिटीशांनी जंगलविषयक जुने नियम आपल्याला हवे तसे लोकांच्या डोळ्यात धुळ फेकतील अशा स्वरुपात बनविले होते. जेणेकरुन गरीब शेतकऱ्यात आपली दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न ब्रिटीश सरकारने केला. यातून आपल्याला ब्रिटीशांच्या अन्यायाची कल्पना येते. याच्याविरुद्ध शेतकऱ्यांनी तक्रारी करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरीत जनता अन्यायाविरुद्ध आवाज करु लागली, या कायद्याविषयक सरकारकडे तक्रारही करु लागली. या तक्रारीचे स्वरुप फक्त झाडाबाबतीत मर्यादीत राहिले नाही. तर ब्रिटीश सरकारने गुरे चराईवरही बंदी आणली. ज्या भागात गुरे चरत त्या चराईवर दंड आकारण्यात येवू लागला. मात्र गरीब लोक या कायद्याखाली भरडले गेले.

## २.४. शेतकऱ्यांचा जंगल कायदयांना विरोध:

राखीव झाडापाठोपाठ ब्रिटीश शासनाने गुरे चराईस बंदी केली होती. जगंलाच्या ठराविक भागात गुरे चारण्यास मनाई करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जंगल खात्यासंबंधाच्या तक्रारी पैकी मुख्य व महत्त्वाची तक्रार म्हणजे गुरे चराई ही होती. गुरेचराईमध्ये ६ तक्रारींचा समावेश होता.[२४] १) गुरे चराईची फो २) गुरे चराईचे क्षेत्रफळ ३) अंजनाची झाडे व त्यांचा पाला ४) गुरांवर फो आकारण्यात यावी ५) बकरी व मेंढयांची चरण्याची सोय. याशिवाय शेतकऱ्यांची मुख्य तक्रार जंगलविभागतील मालकी हक्कासंबंधी होती. जमिन खाजगी मालकीची पण जंगल अधिकाऱ्यांनी त्यात सागवान, चंदन यासारखी मोठी इमारती झाडे आहेत, असे पाहून त्या जमिनीला जंगलखात्याचे नियम लावण्यास सुरुवात केली.[२५] त्यामुळे शेकतकऱ्यांनी ब्रिटीश सरकारकडे तक्रारी करण्यास सुरुवात केली.

शेतकऱ्यांच्या गुरांना पोटभर चारा नाही, शेताला टहाळा, राव जंगलातून नेता येत नाही, झोपडी बांधण्याला लाकूड फाटा मिळू शकत नाही, मालकी जमिनीतील झाडावरदेखील स्वत:ची सत्ता नाही याला तक्रारी स्वरुपात शेतकरी उत्तर मागत होते. कारण याचे शेतकऱ्यांवर प्रत्यक्ष परिणाम झाले.

## २.५) जंगलविषयक कायदयाचे शेतकऱ्यांवर झालेले परिणाम :

फॉरेस्ट खात्याच्या धोरणामुळे गरीब शेतकऱ्यास खुप त्रास झाला. चूक नसतानाही शेतकऱ्याला कधी कधी शिक्षा भोगावी लागत होती. त्याच्यावरच्या दंडाचे स्वरुप दुप्पटी होते. याची कल्पना आपणाला पुढील उदाहरणावरुन येईल.

जंगल खात्याच्या तक्रारीसंबंधी चौकशी करण्यासाठी १९२५ ला जी कमिटी नेमण्यात आली.[२६] त्या कमिटीवरील बिन सरकारी सभासदांनी दिलेले एक

उदाहरण[२७] : १९२५ च्या मार्च महिन्यास यावल पेट्यात लागली होती. तेव्हा १६ खेडंयाचा संबंध या आगीशी जोडण्यात आला. आग विझविण्यासाठी चार खेड्यातून ११८ लोक व दुसऱ्या सहा खेड्यातून काही उशिराने ९४ शेतकरी येवून हजर झाले व बाकीच्या सहा खेड्यातून कोणीच येवू शकले नाही पण जंगल खात्याचा न्याय असा की, सर्व खेड्यातील शेतकऱ्यांना दंड आकारणी वाढत्या दराने करण्यात आली. या जादा आकरणीला कारण काय तर २१२ माणसे येवूनही ही आग विझली नाही म्हणून सर्वांना शिक्षा म्हणजे काय तर ज्याच्या मालकीची गुरे जास्त तितकी जादा आकारणी. एका प्रशासकीय रिपोर्टात तर असे सांगण्यात आले की, सांघिक शिक्षा अशा स्वरुपाची असावी की ज्या रानाला आग लागली असेल ते रानच गुरे चराईला देण्यात येवू नये, जणु काय गुरे चराईकरिता शेतकरीच जंगलांना आगी लावतात असा हा विरोधात्मक अन्याय.

काही नियमामध्ये तर खाजगी मालकीच्या राखील जंगल विभागातील जमीन सरकारने मालकाला परत दिली. अगर त्यातील झाडे सरकाने एकदा तोडली तर त्या जमीनीवर व त्या जागेतील झाडवाढीवर सरकारचा हक्क पोचू शकत नाही. हा नियम १८८१ मध्ये झाला.[२८] पण लगेचच १८८३ जून मध्ये नवीन नियम करण्यात आला की, कुलाबा, रत्नागिरी, ठाणे जिल्ह्यातील वरकस जमिनीला नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्याला व कारवार जिल्ह्यातील 'बिटा' जमिनीला हा नियम लागू करता येवू नये. कारण १८९८ ते १९०९ या काळात ठाणे जिल्ह्यातील खाजगी जमिनीतील लाकूड विकून सरकारने २३ लाख रुपये खिशात टाकले.[२९]

असाच प्रकार गुरेचराई बाबतीतही झाला. कित्येक दिवस गुरे चराईची फो द्यावी लागत नसे. नंतर वर्षातून फक्त काही ठराविक महिनेच मोफत गुरांना चरण्याची परवानगी देण्यात येवून लागली. नंतर थोडी फार गुरे चराईची फो म्हणून

सुरु झाली. यानंतर गुरांच्या संख्येवर नियंत्रण घालण्यात आले. पण याही पेक्षा एक वेगळे कारण सरकारने दाखविले ते म्हणजे फक्त २९ रुपये शेतसारा भरणाऱ्या खातेदाराला गुरे चराईची आकारणी नाही. पण पुढे हीही सवलत नाहिशी होऊन सरसकट सर्वावरच आकारणी होवू लागली. नंतर गुरामागे दोन आणे अशी आकारणी करण्यात आली.

१९२३-२४ साली सर्वत्र जंगल खात्याचा अंमल सुरु झाला. याचे प्रत्यंतर खालील गुरचराईच्या वार्षिक उत्पन्नाच्या आकड्यावरुन दिसून येईल. [३०]

| वर्षे | वार्षिक उत्पन्न |
|---|---|
| १९२० - २१ - | २ लाख ७९ हजार |
| १९२२ - २३ | ४ लाख ८५ हजार |
| १९२४ - २४ | ५ लाख २१ हजार. |
| १९२८ - २९ | ५ लाख ३७ हजार |

यावरुन असे स्पष्ट होते की, १९२०-१९२९ पर्यंत दरवर्षी गुरेचराईच्या वार्षिक उत्पन्नात वाढच होत गेली आहे. अधिकाधिक गुरे चराईचे कायदे कडक होवून त्यावरील दंड वाढत गेला आहे. ही वाढ फक्त गुरे चराईच्या आकारणीतच झाली नसून गवत, पाला, सरपण, काटेरी झुडपे यांच्या दरातही वाढ झाली. हे आपल्याला खालील कोष्टकावरुन समजेल. [३१]

| जंगलातील उत्पन्न | जुने दर | नवे वाढलेले दर |
|---|---|---|
| दरगुराप्रमाणे गुरेचराईची फी | २ आणे | ४ आणे |
| गवताची गंडी | ४ आणे | १ रुपये (काही ठिकाणी)<br>८ आणे( सरसकट) |
| गवताची परंड | १/२ आणे | २ आणे (काही ठिकाणी)<br>१ आणे( सरसकट) |
| पाला ( अंजन)<br>१ ओझे (मासिक आकार )<br>गाडाभर (मासिक ) | <br>२ रु.<br>३० रु. | <br>४ रु.<br>३० रु. |
| काटेरी | ४ आणे | ८ आणे |
| सरपण व टहाळ | ८ आणे | १ रुपया |
| बांबू (१००) | २॥ रु. | ४ रुपये |

15136

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, गुरे चराई फी दुप्पट वाढली तर गवताची गंडी चौपट वाढली, गवताची परंड दुप्पट चौपट वाढली व अंजनाचा पालाही दुप्पट झाला यातुन काटेरी टहाळ, सरपण व बांबू यांच्या दरात झालेली वाढ ही स्पष्ट होते.

यावरुन आपणास असे समजते की, ब्रिटीश शासनाची आर्थिक निती कालानुसार बदलत गेली. आपले उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी जनतेच्या दैनंदिन गरजेवर बोट ठेवले. ज्यावर हे गरीब भारतीय अवलंबून आहेत त्यावरच त्यांनी घाव घालण्याचा प्रयत्न चालू केला होता. यावरुन त्याच्या शासन व्यवस्थेचे स्वरुप लक्षात येते. याचमुळे जंगलात बेकायदा गुरे चारण्याचे गुन्हे व कोडवाड्यात कोंडलेली जनावरे यांची संख्या मध्यभागात अतोनात वाढत होती. याची चौकशी करण्यासाठी मुंबई कौन्सिलनले १९२५ मध्ये जी कमिटी नेमली होती, त्या कमिटीच्या रिपोर्टनुसार लागवडीस आलेले शेतकऱ्याच्या जमिनीमधील बहुतेक पडजमिन फॉरेस्टात घेऊन बंदोबस्ताची जंगले चराईस बंद केल्यामुळे व एप्रिल ते ऑगस्टच्या पाच महिन्यात चराईची बंदी केल्यामुळे मध्य भागात फॉरेस्टच्या गुन्ह्यांची संख्या अमर्याद फुगते, तसेच गावठाणानजीकच्या व पाणवठ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या जमिनीही बंदीच्या जंगलात सामील केल्यामुळे गुन्ह्यांची संख्या वाढली आहे. असे कमिटीने मत दिले.[३२] एप्रिल ते १५ ऑगस्ट पर्यंतच्या म्हणजेच ऐन उन्हाळा व पावसाळ्याचा पूर्व भाग यामध्ये जंगलातील चराईची बंदी करण्याच्या नियमामुळे तर रयतेवर जितका अनन्वित जुलूम (dounright oppression) होतो. जितका दुसऱ्या कोणत्याही नियमाने होत नसेल असा कमिटीने स्पष्ट अभिप्राय दिला.

अशा प्रकारचे अनेक परिणाम शेतकरी जीवनावर होवून शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले त्यांचे उभे आयुष्य कर आणि कर्जबाजारीपणा याखालीच वाकून गेले. म्हणूनच ब्रिटीश शासनाकडून जंगल कायद्यात त्यांना सुधारणा आवश्यक होत्या.

## २.६) शेतकऱ्यांना ब्रिटीश शासनाकडून अपेक्षित बदल :

ब्रिटीशांनी जंगलविषयक कायदे अंमलात आणल्यानंतर भारतीय शेतकऱ्यावर अन्याय होण्यास सुरुवात झाली. यावेळी होणाऱ्या अन्यायाल सहन करत करत शेतकऱ्यांचे म्हणणे एवढेच होते की, जंगलातील लाकूड फाटे, टहाळा, सरपण व गुरांना चारा, गवत व वैरण शक्य तर मोफत निदान कमी दराने मिळावी, तो जंगलातील शेतकरी वर्गाचा नैसर्गिक हक्क आहे.[३३]

चंदन, सागवान, खैर यासारखी जंगले सरकारने राखून ठेवावी, पण आगकाड्याच्या पेट्या व इतर पदार्थ तयार करण्याकरिता कोणत्या प्रकारचे लाकूड कोणत्या प्रदेशात उत्पन्न होते त्याचे संशोधन करुन त्याचा फायदा कारखानदारांनाही द्यावा.[३४]

अशा प्रकारच्या अनेक सुधारणा शेतकऱ्यांना आवश्य होत्या. जंगल कायद्याच्या कठोरतेमुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष कमी व्हावा असे वाटत असेल तर, जंगल खात्यातील अधिकाऱ्यांच्या अंमलबजावणीसाठी खालील सुधारणा अंमलात येणे आवश्यक होते.[३५]

१) गुरेचराईची फी घेण्यात येवू नये व जेथे पूर्वापार कमी दर चालू असतील तेथे ती गावच्या अधिकाऱ्यामार्फत वसूल करण्यात यावी.

२) वनचराईच्या क्षेत्राला जिल्ह्याची सीमा ठेवण्यात यावी.

३) गावांपासून पाव मैलाच्या आत केव्हाही जंगल खात्याची मर्यादा असू नये या भागात सर्व गुरांना चरण्याची मोकळीक असावी.

४) कॉट्रॅक्टरांनी टाकून दिलेले सरपण व लाकूड नेण्याची परवानगी शेतकऱ्यांना देण्यात यावी.

५) वटलेले लाकूड व झाड फुकट नेण्याची परवानगी असावी.

६) जंगलातील शेतकऱ्याला उपयोगी अशा बारीक सारीक जिनसांवर जादा आकारणी करण्यात येवू नये.

७) आगीमुळे घरादाराचे नुकसान झाले असेल तेव्हा लाकुडफाटा शक्य तितक्या लवकर मामलेदारांच्या शिफारशीवरुन फॉरेस्ट रेंजरमार्फत मिळावा.

८) एका महिन्याच्या आत लाकूड कापण्याचा परवाना न आल्यास परवान्याशिवाय कापण्याची परवानगी देण्यात यावी.

९) बंदूकीच्या परवान्याचे व शिफारशीचे जाचक नियम कमी करण्यात यावे.

१०) जंगलातून पाण्याचे पाट नेण्याची परवानगी देण्यात यावी व दोन आण्यापेक्षा आधिक आकार करण्यात येवू नये.

११) जंगल खात्यामार्फत शेतकऱ्यांनी काही जंगलविषयक काम केले तर त्यांना भरपूर रोजमुरा मिळावा.

१२) स्थानिक चौकशी कमिटया नेमण्यात येवून शेतकऱ्यांच्या तक्रारींची दाद त्या कमिट्यामार्फत लावण्यात यावी.

१३) जंगल खात्याचा नवीन कायदा प्रांतिक सरकारने करावा.

या सुधारणा विचार करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी मुंबई मध्ये १९२५ मध्ये एका चौकशी कमिटीची स्थापना केली गेली.

## २.७) शेतकऱ्यांच्या तक्रारी संबंधी चौकशी कमिटीची स्थापना : (१९२५)

जंगलातील राखीव झाडे तोडणे, बेकायदा गुरे चारणे व कोंडवाढ्यात कोंडलेली जनावरे यांची संख्या मध्यभागात अतोनात वाढत होती. याची चौकशी करण्यासाठी मुंबई कायदे कौन्सिलमार्फत १९२५ साली एक स्वतंत्र कमिटी नेमण्यात आली. या कमिटीच्या रिपोर्टनुसार लागवडीस आलेल्या शेतकऱ्याच्या जमिनीमधील बहुतेक पडजमिनी फॉरेस्टात घेवून बेबंदोबस्ताची जंगले चराईस बंद केल्यामुळे व एप्रिल ते ऑगस्टच्या पाच महिन्यात चराईचे बंदी केल्यामुळेच मध्य भागात फॉरेस्टांच्या गुन्ह्याची संख्या अमर्याद वाढत आहे. तसेच गावठाणानजीकच्या व पाणवठ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या जमिनीही बंदिस्त जंगलात सामील केल्यामुळे ही वरील संख्या वाढली आहे, असे कमिटीने मत दिले.[३६] १ एप्रिल ते १५ ऑगस्ट पर्यंतच्या म्हणजेच ऐन उन्हाळा व पावसाळ्याचा पूर्वभाग यामध्ये जंगलातील चराईची बंदी करण्याच्या नियमामुळे तर रयतेवर जितका अनन्वित जुलूम (dounright oppression) होतो, तितका दुसऱ्या कोणत्याही नियमाने होत नसेल असा कमिटीने स्पष्ट अभिप्राय दिला.[३७]

**चौकशी कमिटीने मांडलेल्या उपाययोजना :**[३८]

१) कोणत्याही जंगल चराईस बंदी करावयाची असेल तर ती १० वर्षाहून जास्त करु नये.

२) पावणठ्याच्या वाटेपासून १०० यार्डच्या गावठाणापासून पाव मैलाचे आत असलेले जंगल बंदी केलेले समजू नये.

३) बेबंदोबस्ताचे जंगल सामान्यत: गायरान व चराईचे कुरण समजून बंदी न करता खुले ठेवावे. तसेच ज्या भागातील शेतकरी जंगलास आगी न लावण्याचे कामी अधिकाऱ्यास मदत करतील. त्याची गुरेचराईची फो पूर्ण माफ करावी.

४) जेथे गुरे बेकायदा चारण्याचे गुन्हे कमी होतील तेथील चराईची फो कमी करावी.

५) गायरानांची व्यवस्था करण्याचे काम निवडक गावी पंचायतीकडे द्यावे. असे उपाय योजण्याचे व सवलती देण्याचे सवरकारने ठरविले. तसेच,

६) महाराष्ट्रातील वृक्ष रहित जंगले फॉरेस्टखात्याचे ताब्यातून काढून मुलकीखात्याकडे देण्याचे ठरवून सरकारने त्या भागातील रयतेला जंगलखात्याच्या जुलमापासून सोडविण्याचा उपक्रम केला.

७) सोलापूर जिल्ह्यातील सगळे फॉरेस्ट अकोला व संगमनेर मधील जंगले आणि कोपरगाव व श्रीगोंदे मधील बाभळीची कुरणे याखेरीज नगर जिल्ह्यातील सर्व फॉरेस्ट सातारा जिल्ह्याच्या मधोमध दक्षिणोत्तर पसरलेल्या डोंगराच्या ओळीच्या पूर्वेस असलेल्या चारही तालुक्यातील फॉरेस्ट निफाड (नाशिक) तालुक्यातील बाभळीची कुरणे व पूर्व खानदेशाच्या चाळीस गाव तालुक्यातील सातमाळखालचे सर्व जंगल ही कमिटीच्या सुचनेप्रमाणे फॉरेस्ट खात्याकडून काढून यापुढे मुलकी खात्याकडे देण्याचे ठरविले.

८) मुलकी खात्याकडे आलेल्या या जंगलापैकी कोणती जमिन गायरान म्हणून चराईसाठी ठेवायची व शेतकऱ्यास कोणती लागवडीस द्यावयाची हे ठरविण्याचे काम मुलकी खात्याकडेच सोपविण्यात आले.

मात्र कमिटीच्या या रिर्पोटचा काही उपयोग झाला नाही. कारण ब्रिटोश जंगल कायद्याचे शेतकरी जीवनावर फार गंभीर परिणाम झाले होते. तसेच चारा मुबलक न मिळाल्यामुळे त्यांची गुरे दुर्बल झाली. कोंडवाड्याच्या खटल्यात झालेल्या दंडाबद्दल त्यांचे पैसे गेले त्यामुळे त्यांच्या कर्जात भर पडली. फॉरेस्टात गेल्यामुळे कितीतरी जमिन नापीक बनली म्हणूनच या अन्यायाचा वाचा फोडण्यासाठी या गरीब शेतकरी वर्गाने गांधीजींच्या कायदेभंग चळवळीला पाठिंबा देऊन आपल्या गावोगावी प्रतिकात्मक असे सत्याग्रह घडवून आणले.

## २.८) जंगल सत्याग्रहाचे स्वरुप :

मिठाच्या सत्याग्रहापेक्षा जंगल सत्याग्रह हा संपूर्ण रित्या निराळा होता. मिठावरील कर हा जनतेवर अप्रत्यक्ष कर होता. त्यामुळे तो लोकांना जाणवला नाही. परंतु वनराईसाठीचा कर हा शेतकऱ्याला प्रत्यक्ष आपल्या खिशातून भरावा लागत असे. त्यामुळे त्याची झळ ही शेतकऱ्यांनाच बसे. यातूनच हे सविनय कायदेभंगाचे जनआंदोलन घडले. सर्व स्तरावरील लोकांनी कॉंग्रेसच्या एकाच राष्ट्रीय झेंड्याखाली एकत्र येऊन जंगल सत्याग्रहाची मोहिम आखली व अन्यायाला वाचा फोडली.

**'जंगल सत्याग्रह'** म्हणजे गरीब शेतकरी आणि आदिवासी वसाहतीत राजवटीने राखीव केलेल्या वनस्पतीचे परंपरागत नित्याचे हक्क प्रस्थापित करणे होय'.[३९] म्हणूनच या सत्याग्रहात शेतकऱ्यांना ज्या नैसर्गिक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. ते हक्क मिळविण्यासाठी भारतीय खेड्यातील ही गरीब जनता एकत्र आली होती. यातूनच त्यांना आपली एकजूट दाखवून प्रतिकात्मक स्वरुपात ब्रिटीश शासन व्यवस्थेला आपला विरोध दर्शवावयाचा होता.

शासनाने घोषित केलेल्या बंदी भागात फक्त प्रवेश करणे हा त्यांचा उद्देश होता. त्यामुळे त्याभागात जाऊन राखीव झाडे म्हणून घोषीत केलेली झाडे तोडणे, गुरे चराईस बंदी केलेल्या भागास आपली गुरे चारण्यास सोडणे, कोंडखान्यात गुरे नेत असता त्याला विरोध करणे, गुरे चराई फी न भरणे, गवत कापणी यावर आकारलेला कर न भरणे, बंदी भागात गुरे चारणे हे कार्यक्रम आयोजित केले जात असत. मात्र हे सर्व अंहिसात्मक मार्गाने होत असे. काही ठिकाणी याला अपवाद आढळून येतात. उदा. चिरनेर. याठिकाणी मोठ्या प्रमाणात जंगल सत्याग्रहाला हिंसक वळण प्राप्त झाले. मात्र हिंसा न करता सत्याचा आग्रह धरणे ही बापूजींची शिकवण होती.

हे राष्ट्रीय स्तरावरील आंदोलन असल्यामुळे सर्व भारतभरातून याला पाठिंबा मिळाला. महाराष्ट्राचाही यात उच्चाही असा सहभाग आहे. यातून १९३० मध्ये 'महाराष्ट्र जंगल सत्याग्रह' समितीची स्थापना होवून त्याव्दारे अनेक कार्यक्रम आखले गेले व ते पुर्णत्वास नेले. यावरुन शेतकऱ्यांमध्ये झालेली जागृती व अन्यायाची चीड दिसून येते.

## २.९. महाराष्ट्र जंगल सत्याग्रह समितीची स्थापना : (९ मे १९३०)

शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी मुंबई कायदे कौन्सिलने १९२५ मध्ये जी समिती नेमली होती. त्या चौकशी कमिटीने केलेल्या शिफारशीवर मात्र फारसा विचार झाला नाही. त्यावरती कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नव्हती. गांधीजींनी पुकारलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेणाऱ्या कार्यक्रमाणी आखणी करण्यासाठी महाराष्ट्रात जे मंडख स्थापन करण्यात आले होते त्या युद्ध मंडळाने शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांना हात घालण्यासाठी ९ मे

१९३० च्या बैठकीत 'महराष्ट्र जंगल सत्याग्रह' समितीची स्थापना केली.[४०] या समितीचे सदस्य [४१]

१) श्री.रामकृष्णदास महाराज २) श्री. श्री.शं.नवरे ३) श्री. डॉ.कृष्णराव अंत्रोलीकर ४) श्री. गोविंदराव देशपांडे यांनी 'मिठाकडून जंगलाकडे' असे पत्रक काढले.

या समितीच्या कार्यक्रमाव्दारे शेतकऱ्यांना संरक्षित अशा भागास जाण्यास आणि वनचराईचा कर न देता गवत आणण्यास प्रवृत्त करण्यात आले. यासाठी कॉंग्रेस सदस्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळण्यासाठी ठिकठिकाणी शिबीरांचे आयोजन करण्यात आले. या समितीचे मुख्य कार्यालय संगमनेरला उघडण्यात आले.[४२] मात्र यावेळी रामकृष्णदास महाराज (लक्ष्मी हरी वाराडकर), लालजी पेंडसे आणि श्रीपाद शंकर नवरे हे तीघे या जंगल सत्याग्रहाचे सुत्रधार होते.[४३] यांच्या नेतृत्त्वाखाली मिठाचा कायदेभंग झाल्यांनतर महाराष्ट्रात व व्हाड मध्य प्रांतात जंगल कायदेभंगाला सुरुवात झाली. समुद्राच्या पाण्याप्रमाणे जंगल संपत्तीवरही मानवाचा नैसर्गिक हक्क आहे. असे तळागाळातल्या शेतकऱ्यांच्या मनावर बिंबविण्यास सुरुवात झाली. या चळवळीचे विशेष हेच होते की, यात महराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांनी भाग घेतला, कायद्याचा जुलूम जितका जास्त प्रमाणावर असतो तितक्या मोठ्या प्रमाणावर त्याविरुद्ध होणाऱ्या चळवळीचे ज्ञान सामान्य जनतेत पसरले. घरीदारी, पळसात, शेतात या जंगल कायद्याचे स्वरुप त्यांना अनुभवायला मिळत होते. याचमुळे महाराष्ट्रातील शेतकरी खडबडून जागा झाला. यातुनच महराष्ट्रात अनेक ठिकाणी 'जंगल सत्याग्रह ' घडून आले.

## २.१० महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह :

जंगलासंबंधीच्या कायदयातील जाचक तरतूदी बद्दलचा असंतोष लक्षात घेवून मिठाच्या कायदयाप्रमाणेच जंगला संबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती १९३० च्या जुलैपासून वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोला हे तालुके ही चळवळ करण्यास अनुकूल क्षेत्र ठरतील असे जंगल सत्याग्रह समितीला वाटले आणि तिचे मुख्य कार्यालय संगमनेरला उघडण्यात आले.[४४]

जंगल सत्याग्रहासाठी नेमलेल्या युद्धमंडळाने मे २२ पासूनच तेथे शिबिर चालू केले होते.[४५] तेथील कार्यक्षेत्र डोंगराळ भागात होते. त्या भागात वाहतुकीच्या सोयी नव्हत्या. मध्यवर्ती योजना अंमलात आणण्यासाठी संगमनेर आणि अकोला तालुक्यात अनेक उपशिबिरे संघटीत करण्यात आली होती. त्यामुळे ही चळवळ महाराष्ट्रात वणव्यासारखी पसरली.

महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह शिबिराची सुरुवात संगमनेर व अकोला तालुक्यात २२ जुलै १९३० ला आषाढी एकादशीच्या दिवशी झाली.[४६] संगमनेर व अकोला तालुक्यातील वीस बावीस ठिकाणी एकाच वेळी हा जंगल सत्याग्रह करण्यात आला.[४७] कोपरगाव आणि राहुरी तालुक्यातील जंगल सत्याग्रहाचे हे लोण पसरले होते. यातूनच भारतभर जंगल सत्याग्रह घडून आले.

### संगमनेर –

संगमनेर येथील जंगल सत्याग्रहात पुतल्या टेकड्या, पेमगिरी, चंदनपूर, समशेदपूर इत्यादी गावांचा सहभाग होता. यावेळी गावच्या लोकांनी ५००

गायींना गुरेचराई भागात चरण्यास सोडले. यावेळी नवरे यांनी या लोकांना जंगल कायदे मोडण्यास प्रोत्साहित केल्याबद्दल २३जुलै१९३०ला अटक करण्यात आली.[४८]

१७ ऑगस्ट १९३० रोजी जनावरांसाठी राखीव जंगलातील गवत कापणी सत्याग्रह झाला. तसेच धारगाव, संगमनेर, कोतुळ आणि कोपरगाव तालुक्यात पोलिस अधिकारी व सरकारी नोकर यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला.[४९] १९३० मध्ये अकोले आणि संमगनेर तालुक्यात हे सत्याग्रह महत्वपूर्ण ठरले याचे एक कारण म्हणजे या सत्याग्रहात तलाठी व पोलिस पाटील यांनी सरकारचे प्रतिनिधी असतानाही आपले राजीनामे सरकारला सुपूर्त केले. म्हणजेच सरकारची यंत्रणाच सरकारविरुद्ध सामान्य लोकांना अन्यायाविरुद्ध झगडण्यास मदत करत होती.

**नाशिक –**

नाशिक जिल्ह्यात सटाणा, बागलाण, कळवण या तालुक्यात जंगल सत्याग्रह झाला . या जिल्ह्यातील स्वंयसेवक सटाणा, कळवण, मालेगाव तालुक्यात फिरुन त्यांनी गावातील लोकांना चळवळीत भाग घेण्यास भाग पाडले. तसेच गावच्या सरकारी अधिकाऱ्यांना राजीनामे देण्यास भाग पाडले.[५०] दादासाहेब गद्रे, महंत, सीताराम शास्त्री आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे बागलाणातील सत्याग्रहाचे प्रमुख नेते होते. नागपूर भागातील सुमारे २५० पोलिस पाटलांपैकी २०० पोलिस पाटलांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले.[५१] जवळजवळ एक लाख लोकांनी या सत्याग्रहात भाग घेतला. यात दोन हजार स्त्रिया होत्या. १८ ऑक्टोबर १९२० ला दहा बारा हजार लोक चणाकपुरच्या तळ्याजवळील टेकडीवर जमले. परंतू त्या टेकडीला पोलिसांनी हेरले होते. यावेळी झालेल्या लढाईत शेकडो मृतदेह पडले. सहा पुढाऱ्यांना दीर्घमुदतीच्या शिक्षा झाल्या. परंतू टेंभा गावच्या शंभर

स्त्रियांनी पोलिसांना वेढा देवून त्या सत्याग्रहींना सोडविण्यास भाग पाडले.[५२] तसेच चणाकपूरच्या कोळ्यांनी 'ब्रिटीश राज्य आता गेले आहे व गांधीराज्य आले आहे' अशा भावनेने २ ऑगस्ट १९३० ला समारंभपूर्वक काँग्रेसच्या घोषणा देवून पोलिसांच्या गोळीबाराला दगड धोंड्याने उत्तर दिले.

**खानदेश –**

खानदेशातील शहाडे, नंदूरबार, साकी, शिंदखेड आदि ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. यात ५० हजारच्या वरती लोकांचा सहभाग होता.[५३] ऑगस्ट १९३० मध्ये धुळे जिल्ह्यातीन शहाडा या ठिकाणी बहुजनांचा सत्याग्रह झाला. येथे पाटीदार व गुजर प्रभावी होते. यात १५ ते २० हजार शेतकऱ्यांचा सहभाग होता. त्यात ३ ते ४ हजार स्त्रिया होत्या.[५४] तसेच बाल्ना, पारगाव, धोंगडे, पाणखेड आणि मानदाना येथील सरकारी अधिकाऱ्यांनीही आपले राजीनामे दिले.[५५]

अशाच प्रकारचे सत्याग्रह जळगाव जिल्ह्यातील राव्हर, यावल, चाळीसगाव व पाचोरा या तालुक्यात ही मोठ्या प्रमाणात झाले. खानदेश हा भाग स्वातंत्र्य चळवळीत सर्वात जास्त सक्रिय होता. ८१८ स्वातंत्र्या सैनिक येथून अटक करण्यात आले होते. यातील ४४८ जणांना वेगवेगळ्या कामगिरीसाठी गौरविण्यात आले होते. या सविनय कायदेभंग चळवळीचे पडसाद फार मोठ्या प्रमाणात खानदेशात पडल्याचे दिसून येते.

**पुणे –**

पुण्यात आंबेगाव पेठेत जंगलाचे कायदे मोडून जंगल सत्याग्रहास सुरुवात झाली. यामध्ये झाडे तोडणे त्यात सागाची झाडे तोडणे, चंदनाची झाडे तोडणे, बंदी भागात गुरे चारणे यासारखे कार्यक्रम आखले गेले. ६ जुलैला गाणगापूर

मधील एक हजार सागवानाची झाडे तोडण्यात आली.[५६] नारोजी, शेणोली, साकरी, पिंपळगाव या गावात गुरे चराईची फी न भरता सत्याग्रह करण्यात आला.

गोडा येथील सत्याग्रहीन मारुती कासार याने लोकांना सांगून अगदी शांततेच्या मार्गाने जंगल सत्याग्रह घडवून आणला. त्याच प्रकारचे नेतृत्त्व करणारा जयराम काले या दोघांना दोन महिन्याचा कडक कारावास भोगावा लागला.[५७]

६ जुलैला गाणगापूर येथील एक हजार सागवानाची झाडे, शेणाली पाचशे चंदनाची आणि एक हजार सागाची झाडे पाडण्यात आली तसेच नारडोली, शेणोली, साकरी, पिंपळगाव, म्हसवड, डोनी, त्रीपड आणि अंबेगाव याठिकाणी गुरे चराईची फो न भरता जंगल सत्याग्रह करण्यात आला. अशा प्रकारे संपूर्ण पुणे जिल्ह्यात जंगल सत्याग्रहाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

**ठाणे –**

२८ जून १९३० ला ठाणे जिल्ह्यातील जुचुनद्रा मधील राखीव जंगलात तरुण मुलांसहित वीस गावकऱ्यांनी प्रवेश करुन जंगलाचा कायदा मोडला. त्यांनी तेथे जावून सागवानाची झाडे तोडली. ती गावात आणत असता त्यांना जंगलाचे संरक्षक वाटेत भेटले. परंतु त्यांना न जुमानता एक सागवानी सोट गावात आणून तो गावातील शाळेच्या बाहेर उभारुन त्यावरती त्यांनी कॉंग्रेसचा झेंडा फडकविला.[५८] परंतु दुसऱ्या दिवशी आलेल्या जंगल रेंजर ऑफिसरनेही कोणताही आक्षेप घेतला नाही. कारण येथील लोकांच्या विरोधात त्याची शक्ती कमी होती. पुढे २ सप्टेंबर १९३० ला ही ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात स्थानिक पातळीवरील धालकान हायस्कूलमध्ये कॉंग्रेसचा झेंडा उभारण्यात आला.[५९] अशा प्रकारचे अनेक जंगल सत्याग्रह ठाणे जिल्ह्यातही झाले.

## कुलाबा –

सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून कुलाबा जिल्ह्यात जंगल सत्याग्रहाची सुरुवात झाली. याचे नेतृत्त्व डी.के. कुंठे , व्ही.एन. उपाध्ये यांनी गावपातळीवरती केले. अलीबाग हे येथील महत्त्वाचे केंद्र होते. १६ ऑगस्ट १९३० रोजी अलीबाग मधील २०० खेडुतांनी जंगल कायदे मोडले. यात झाडाच्या फांद्या मोडल्या तसेच राष्ट्रीय झेंडा फडकवीत ठेवला. २३ ऑगस्ट १९३० ला पी.टी.व्हीहारी आणि एम.आर.पाटील यांना पकडण्यात आले. खाले येथील जंगल सत्याग्रहात तीन हजार लोकांनी एक हजार झाडांची तोड करुन जंगल कायदा मोडला. यात बारा जणांना अटक झाली.[६०] अशाच प्रकारचा कुलाबा जिल्ह्यातील हिंसात्मक जंगल सत्याग्रह म्हणजे चिरनेर जंगल सत्याग्रह होय.

## चिरनेर –

कुलाबा जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात चिरनेरला २५ सप्टेंबर १९३० ला जंगल कायदा मोडला गेला. सुमारे पाच ते सहा हजार स्त्री पुरुषांनी चिरनेरजवळील अक्कादेवीच्या डोंगरावर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या समवेत गवत कापण्यास सुरुवात केली. यावेळी २० जणांना अटक करण्यात आली. लोकांनी याला विरोध केला. मॅजिस्ट्रेट यांनी या बेड्या काढण्यास सांगितले. परंतु डोंगर खाली उतरुन येत असताना झालेल्या मारामारीत पोलिसांच्या गोळीबाराचा आवाज आला. यावेळी मॅजिस्ट्रेट जोशी , फॉरेस्ट गार्ड शेवडे दोन कॉन्स्टेबल, एक हेड कॉन्स्टेबल असे १२ लोक गोळ्या लागून मृत झाले होते.[६१] या लढ्याचे नेतृत्त्व दादाभाई गुप्ते करत होते. यांनी ही परिस्थिती शांत करण्याचा फार प्रयत्न केला. परंतु यावेळी चिरनेर मध्ये झालेला गोळीबार हा जालियनवाला बागेची छोटी पुनरावृत्तीच होती.[६२] या

गोळीबारात जखमी झालेल्या लोक ांना मुंबईच्या फिरत्या कॉंग्रेस हॉस्पीटलमध्ये हलविण्यात आले. या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी पुण्याच्या सार्वजनिक सभेने बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली चौक शी समिती नियुक्त केली. त्या समितीचे सदस्य - हुसेन तय्यबजी, एम.सी. छागला, नारायण रामजी गुंजाळ, एम.एल.सी., ल.र.गोखले, एम.बी.वेल्कर, नारायण नागू पाटील कार्यवाह होते, माधवराव गोडबोले.[६३] या समितीने अहवाल जाहीर केला नाही. कारण यातील आरोपीवर खटले चालू होते. याच ४७ आरोपीवर खटला चालू होता. ज्युरी व असेसर्सनी निर्दोश असा निकाल दिला. सेशन्स जज्जांनी १८ इसमांना निर्दोष सोडले. २० लोकांना जंगल कायदा मोडल्याबद्दल दंड केला, ९ जणांना सहा महिने ते तीन वर्षे सक्त मजुरीच्या शिक्षा दिल्या. चारजणांच्या खुनाचा आरोप दूर होवून निर्दोष सुटले.[६४]

असे भयानक स्वरुप चिरनेर जंगल सत्याग्रहाचे होते. अहिंसक अशा घटनेला अचानक हिंसक रुप प्राप्त झाले. असे हिंसात्मक जंगल सत्याग्रह महाराष्ट्राबाहेर झाले.

## सातारा जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह :

सातारा जिल्ह्यात कामेरी, तांबवे, रेठरे धरण, काले, पेठ, शिराळा, कवठे, प्रचितगड, बेलमाची मायणी, मसूर, इस्लामपूर, विटा व बिळाशी इ. ठिकाणी जंगल कायदे तोडण्यात आले. व ब्रिटीश सरकारला कडवा विरोध दर्शविण्यात आला. यापैकी एक १८ जुलै १९३० ला झालेला 'बिळाशी जंगल सत्याग्रह' होय. याचे वर्णन **'दक्षिणी शेतकऱ्यांचे सशस्त्र बंड'** म्हणून केले जाते.[६५] या सत्याग्रहाच्या वेळी येथील लोकांना सरकारी दडपशाहीला तोंड दयावे लागले. यात गरीब शेतकरी पिसला गेला.

## २.११ महाराष्ट्राबाहेरील जंगल सत्याग्रह :

आंध्रमध्ये १९२१-२२ मध्ये पहिल्यांदा गरीब शेतकऱ्यांनी जंगल कायद्याबाबत तक्रार केली. कुडप्पा मधल्या रायचोटी तालुक्यात तसेच गुंटूर जिल्ह्यातील पल्नाट तालुक्यात हे जंगल सत्याग्रह घडून आले. हे जंगल सत्याग्रह म्हणजे खालच्याच स्तरातील लोकांचे आंदोलन होते. मुख्यत: हे वनचराईबाबत केलेल्या वाढीव दराबाबत होते. त्यामुळे येथील गरीब शेतकऱ्याने गांधीजींच्या बहिष्कार तत्वाचा अवलंब करुन ज्या भागात सरकारने गुरे चराईस बंदी केली होती त्या भागात चराई कर न भरताच आपली गुरे चारण्यास सोडले.[६६] यावेळी ब्रिटीश पोलिसांनी जर या घटनेस विरोध दर्शविला तर येथील संतप्त शेतकरी या पोलिसांवर हल्ला करत. अशाप्रकारे पल्नाट आणि रायचोटी मधील जंगल विषयक कायदे येथील लोकांच्या संतप्त जमावाकडे पाहूनच सरकारने रद्द केले होते.[६७] ही स्थिती १९२१-२२ मध्ये होती. पुढेही १९३० मध्ये असेच जंगल सत्याग्रह मध्य प्रदेश व कर्नाटकमध्ये मोठ्या प्रमाणात झाले.[६८] मध्यप्रांतामध्ये तर गावकरी पोलिस चौकीवर हल्ला करुन नंतर जंगलातील झाडाची तोड करत. थोडक्यात येथील जंगल सत्याग्रहाचे स्वरुप हिंसक असे होते.

पंजाब मधील कांगडा मध्येही डिसेंबर १९३० मध्ये वनविभागतील गुरे चराईच्या संबंधातील नियमांचे उलंघन करुन जंगल सत्याग्रह करण्यात आला.[६९] व ब्रिटीश सत्तेला विरोध दर्शविण्यात आला. ब्रिटीश जंगल कायद्याचा निषेध करणे हा जरी सगळीकडे जंगल सत्याग्रहाचा उद्देश असला तरी तो दर्शविण्याचे मार्ग महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर वेगवेगळे होते. यावरुन हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रीयन लोक गांधीजीच्या तत्त्वाशी निगडीत होते.

याच शेतकऱ्यावर होणाऱ्या अत्याचारांची चौकशी करण्यासासाठी जी कमिटी नेमली होती ती यशस्वी न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारीचे प्रमाण वाढले. शेतकऱ्यांना हव्या असलेल्या जंगल कायद्यातील सुधारणा ही सरकार करत नव्हते. ब्रिटीश जंगल विषयक जुने कायदे व ब्रिटीश जंगल विषयक नवीन कायदे यात मोठा फरक होता. आपल्याला होणाऱ्या आर्थिक उत्पन्नासाठी ब्रिटीश सरकार यात नेहमी फेरफार करत असे. काही तुटपुंज्या अर्थिक लाभासाठीच त्यांनी भारतीय जनतेवर हा अन्याय केला. या पाठीमागील हा एकमेव उद्देश असावा असे वाटत नाही. लोकांमध्ये आपला वचक निर्माण करणे हाही उद्देश होता. परंतु मनात राहणाऱ्या असंतोषचा कधीतरी स्फोट हा होतोच, जेव्हा तो सहनशक्तीच्या बाहेरचा अन्याय असतो. मग समोर राष्ट्रीय काँग्रेसचा नेता असो अगर, गरीब शेतकरी, शेवटी अन्याय सहन करणाऱ्याचा आवाज मोठा असतो. यातुनच आंदोलनाची सुरवात होते. असेच एक आंदोलन म्हणजेच १८ जुलै १९३० चा 'बिळाशी जंगल सत्याग्रह' होय.

## संदर्भ


१. फडके य.दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड ४ था, श्रीविदया प्रकाशन, पुणे, १९९३, पृ.क्र. ६९.

२. कित्ता.

३. राजमाचीकर न.त्रि.,'सटिक हिंदुस्थानचा जंगलाबाबत ॲक्ट - सन १९२७ चा ॲक्ट १६ वा', न्यायाश्रय, पुणे, १९२९, पृ.क्र. १५१.

४. कुबेर वा.ना., 'भारताचा स्वातंत्र्य लढा - १९३०-३४,' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ.क्र. २०२.

५. राजमाचीकर न. त्रि. उपरोक्त पृ.क्र. १२२.

६. सारसंग्रह अर्थात केसरीचे छोटे फाईल, १९३०, जंगल कायद्याविरुद्ध शेतकऱ्यांच्या तक्रारी लेखांक १ ला ७ जून १९३० केसरी मराठा ट्रस्ट नारायण पेठ, पुणे पृ.क्र. ३३५.

७. कित्ता.

८. कित्ता.

९. राजमाचीकर न. त्रि. उपरोक्त पृ.क्र. १५१.

१०. कित्ता.

११. कित्ता.

१२. कित्ता.

१३. कित्ता, पृ.क्र. १२२.

१४. कित्ता.

१५. कित्ता.

१६. कित्ता.

१७. कित्ता.

१८. केसरी, (पुणे) ११ ऑगस्ट १९०८, पृ.क्र. २.

१९. कित्ता.

२०. कित्ता.

२१. कित्ता.

२२. कित्ता.

२३. कित्ता.

२४. केसरी छोटे फाईल १९३०,उपरोक्त, ७ जून १९३०, पृ.क्र. ३३५.

२५. केसरी छोटे फाईल १९३०,उपरोक्त, १० जून १९३०, लेखांक २. पृ.क्र ३४५.

२६. देव शंकरराव, 'महाराष्ट्रातील कायदेभंगाचा इतिहास',चित्रशाळा प्रेस, पुना, १९३१, पृ.क्र. ११

२७. केसरी छोटे फाईल १९३०,उपरोक्त १० जून १९३०, लेखांक २ पृ.क्र . ३४५.

२८. कित्ता.

२९. कित्ता.

३०. केसरी छोटे फाईल १९३०,उपरोक्त, ७ जून १९३०, पृ. क्र. ३३६.

३१. कित्ता.

३२. केसरी, (पुणे) २५ ऑक्टोबर १९३०, पृ.क्र.३.

३३. केसरी छोटे फाईल १९३०, उपरोक्त, ७ जून १९३०, पृ.क्र. ३३५.

३४. केसरी छोटे फाईल १९३०,उपरोक्त, १० जून १९३०, पृ.क्र. ३४५.

३५. केसरी,१४ जून १९३०.

३६. केसरी, २५ ऑक्टोबर १९३०.

३७. कित्ता.

३८. कित्ता.

३९. कुबेर वा.ना., उपरोक्त, पृ.क्र २०२.

४०. कित्ता.

४१. कित्ता.

४२. फडके य.दि., खंड चौथा, उपरोक्त, पृ.क्र. ६९.

४३. देव शंकरराव, उपरोक्त, पृ.क्र. ११.

४४. कित्ता.

४५. कुबेर वा.ना., उपरोक्त, पृ.क्र २०५.

४६. बेलव्हटकर अ.ल., 'महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग चळवळीचा इतिहास', डिसेंबर २००२, अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४७. फडके य.दि., खंड चौथा, उपरोक्त, पृ.क्र. ६९.

४८. बेलव्हटकर अ.ल., उपरोक्त, पृ.क्र. १०९.

४९. Choudhari K.K. (Ed.) Source Material for a History of freedom movement civil Disobedience movement. April-Sept. 1930. Vol XI Gazetteers department Government of Maharashtra. Bombay, 1990, Vol. XIII Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.34, 23 August 1930 Vol XIII Page No. 805.

५०. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.32, 9 August 1930, Page No. 775.

५१. कुबेर वा.ना., उपरोक्त, पृ.क्र २१०.

५२. कित्ता, २११.

५३. बेलव्हटकर अ.ल., उपरोक्त, पृ. क्र.११२.

५४. कुबेर वा.ना., उपरोक्त, प्र.क्र २११.

५५. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.31, 2 August 1930, Page No. 766.

५६. बेलव्हटकर अ.ल., उपरोक्त, पृ. क्र. ११४.

५७. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.33, 9 August 1930, Page No. 780.

५८. बेलव्हटकर अ.ल., उपरोक्त, पृ.क्र. १२८.

५९. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.38, 20 Sept. 1930, Page No. 862.

६०. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.39, 27 Sept. 1930, Page No. 866.

६१. कुबेर वा.ना., पृ.क्र २०८.

६२. कित्ता.

६३. Bombay Presidency Police abstract of Intellignece, Poona, No.38, 20 Sept. 1930, Page No. 864.

६४. कुबेर वा.ना., उपरोक्त, पृ.क्र २०८.

६५. कित्ता, पृ.क्र २१०.

६६. सरकार सुमित, 'आधुनिक भारत' (१८८५-१९४७),
अनुवाद - सुशीला डोभाल,
राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, पटना, २००३, पृ.क्र. २३५.

६७. कित्ता. पृ.क्र. २३६.

६८. कित्ता, पृ.क्र. ३१९.

६९. कित्ता, पृ.क्र. ३२४.